पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक -५३६ दिनांक - १२/०७/२०२३**

## लोणीकंद पोलीस ठाणे, पुणे शहर

# लोणीकंद पोलीसांची हातभट्टीवर कारवाई

लोणीकंद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ग्रामीण भागामध्ये गावठी हातभट्टी दारुचे अवैध धंदे चालु असल्याची माहिती मिळाल्याने त्याप्रमाणे दिनांक ११/०७/२०२३ रोजी लोणीकंद पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विश्वजित काईगंडे यांनी सपोनि रविंद्र गोडसे, सपोनि गजानन जाधव व त्यांच्या तपास पथकाच्या दोन टिम तयार करुन त्यांना योग्य ते निर्देश देउन मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने रवाना केले.

त्यानुसार सपोनि गोडसे, सपोनि जाधव व त्यांच्या टिमने त्यांची वाहने एका विशिष्ट अंतरावर लावुन तेथुन सुमारे १ किमी पायी पिंपरी सांडस गावेचे हद्दीत गट नंबर ८३४ मधील एका पडीक जागेतील हातभट्टीच्या धंदयावर प्रभावी छापा टाकला. त्यामध्ये त्यांनी ७० लिटर दारु जप्त करुन, २५०० लिटर रसायन, त्याशिवाय दारु गाळण्याचे लोखंडी बॅरल, ॲल्युमिनिअमचा पाईप इ साहित्य जागीच ताब्यात घेवुन नष्ट केले. आणि या अनुषंगाने लोणीकंद पोलीस स्टेशनला दिनांक ११/०७/२०२३ रोजी गु.र.क्र. ५६०/२३ कलम महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (फ) (ब) (क), ८३ प्रमाणे अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयात हातभट्टी चालक दोन इसमांना लोणीकंद पोलीसांनी दि. १२/०७/२०२३ रोजी अटक केली आली असुन सदर हातभट्टीसाठी लागणा-या मालाचा पुरवठा करणारा इसम सदर गुन्हयात फरार आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि रविंद्र गोडसे हे करीत आहेत. तसेच यापुर्वी देखिल दिनांक ०१/०७/२०२३ रोजी मौजे भावडी गावचे हद्दीत पोलीसांनी प्रभावी छापा टाकुन हातभट्टी उध्वस्त करुन एकुण ८६,६००/- रुपये किंमतीचा माल हस्तगत करुन त्यामध्ये एकुण ०३ आरोपींना अटक करुन त्यांची ०३ दिवस पोलीस कोठडी रिमांड घेण्यात आली होती.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री. रंजनकुमार शर्मा मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ ४, पुणे शहर, श्री. शशिकांत बोराटे मा.सहा.पोलीस आयुक्त येरवडा विभाग, पुणे शहर, श्री.संजय पाटील यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विश्वजीत काइंगडे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,लोणीकंद पोलीस ठाणे, पुणे शहर,श्री.मारुती पाटील पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्रीमती सीमा ढाकणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), तपास पथकाचे सपोनि रविंद्र गोडसे, सपोनि गजानन जाधव, पोलीस अंमलदार बाळासाहेब सकाटे, सागर जगताप, कैलास साळुंके, विनायक साळवे, स्वप्निल जाधव, अमोल ढोणे, साई रोकडे, सचिन चव्हाण, प्रशांत धुमाळ, महिला पोलीस अंमलदार वृंदावणी चव्हाण, कोमल भोसले, निलम कोळेकर लोणीकंद पोलीस ठाणे, पुणे शहर यांनी केली आहे. यापुढेही लोणीकंद पोलीस स्टेशन हद्दीत अवैध धंद्ये चालु असल्यास **लोणीकंद पोलीस स्टेशन मोबाईल नंबर ९५२७०६९१००** यावर कळविण्याचे आवाहन श्री.विश्वजीत काइंगडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, लोणीकंद पोलीस ठाणे, पुणे शहर यांनी केले आहे.